# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

क्र. सी/कार्या-३डी/कावि-२९२/२०११
दिनांक :- 2 0 NOV 2012

वाचले : १) शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे ज्ञापन क्र.एएमसी २०१०/प्र.क्र.३१५/पदुम-१० दि.१९/१०/२०११.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांचे पत्र क्र.आदुव/मुकाअ/शा१(१)/विद्युत/आदिवासी पाडा/३०६९ दि.१९/११/२०११.

३) मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचे पत्र क्र.CZ/CP-914/2012 दि.३१/१०/२०१२.

**आदेश**

आयुक्त दुग्धव्यवसाय यांनी पत्र क्र.आदुवि १६/१/आरे/जमिन/विसस्टे/४/९८/३९६५ दि.६.९.२०११ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांनी पत्र क्र.आदुव/मुकाअ/शा१(१)/विद्युत/आदिवासी पाडा/२६३८/ दि.२३/०९/२०११. अन्वये मौजे आरे दुग्ध वसाहतीमधील आदिवासी पाड्यांना / अधिकृत झोपडपट्टीधारकांना स्वतंत्रमीटरव्दारे विद्युत पुरवठा करण्यासाठी मे. रिलायन्स एनर्जी यांना ८ मी. x ५ मी. चे ५ भूखंड ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्याबाबत कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांना सूचित केले होते. त्यानुसार उदेशिकेतील अ.क्र.१ चे शासन ज्ञापनान्वये कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांनी मौजे आरे वसाहती मधील ८ मी. X ५ मीटरचे ५ भूखंड मे. रिलायन्स एनर्जी यांना ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यासाठी, व त्या भूखंडाचे भाडे ठरविणे तसेच सदर भूखंड महसूल व वन विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबतच्या अटी व शर्ती ठरविण्याचे कळवून, कोष्टकात नमुद भूखंड महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करणेस मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | युनिट क्रमांक | ठिकाणाचे नांव | सर्वे नं. |
|---|---|---|---|
| १ | ६ | नवापाडा | मौजे :- आरे स.नं.१/अ |
| २ | ५ | बनीचा पाडा | मौजे :- आरे स.नं.१/अ |
| ३ | २५ | खंबाचा पाडा / देवीचा पाडा /गावदेवी पाडा / मटई पाडा | मौजे :- मरोशी स.नं.१६९ |
| ४ | १९ | नवापाडा | मौजे :- परजापूर स.न.१६ |
| ५ | १७ | — | मौजे :- गोरेगांव सर्वे १४/ब पैकी |

शासन महसूल व वन विभाग यांचेकडे प्रत्यार्पित होणा-या भूखंडाचे क्षेत्रास अभिलेख सदरी शासन महसूल व वन विभाग यांचे नांव दाखल करण्याची कारवाई करण्याबाबत तसेच मंजूर भूखंडाचे वार्षिक भाडे निश्चित करुन

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकिय इमारत १० वा मजला,शासकिय वसाहत,बांद्रा (पूर्व)मुंबई ५१
कार्यालय ९१-२६५५६७९९/२६५५७८०७ फॅक्स २६५५६८०५ इमेल mumbaisuburbancollector@mah.gov.in



Scanned by CamScanner

या कार्यालयाने क्र.सी/कार्या-३डी/कावि-२९२/२०११ दि.२३/१२/२०११ नुसार अटी व शर्तीवर आदेश पारीत करण्यात आले. सदर आदेशानुसार मौजे आरे दुग्ध वसाहतीमधील मंजूर ५ सबस्टेशन करीता प्रत्येकी ५ मी. X ८ मी. = ४० चौ.मी. चे क्षेत्रास मंजूरी देण्यात आली होती. प्रकरणी मे. रिलायान्स इन्फ्रास्टक्चर लि. यांनी उद्देशिकेतील क्र.३ चे पत्राने अशी विनंती केली की, मौजे आरे दुग्ध वसाहतीमधील मंजूर ५ सबस्टेशन करीता प्रत्येकी २.५३ मी. X २.५३ = ६.४० चौ.मी. क्षेत्राची आवश्यकता आहे. तसेच सदर ५ भूखंड हे ना-विकास क्षेत्रातील जमिनीमध्ये येत असल्याने त्या भूखंडाचे भाडे शिघ्र सिध्द गणकातील तरतुदी नुसार ना-विकास क्षेत्रातील जमिनीकरीता त्या जमिनीच्या बाजार मुल्यांचे ४०% मुल्यांवर प्रचलित पी.एल.आर. चे दरा प्रमाणे वार्षिक भाडे आकारुन मंजूरी देण्यात यावी.

आरे दुग्ध वसाहती मधील आदिवासी पाडयांना/अधिकृत झोपडीधारकांना स्वतंत्र्य मीटरव्दारे विद्युत पुरवठा करण्यासाठी उक्त कोष्टकात नमुद भूखंड मे. रिलायन्स एनर्जी यांचे ताब्यात देण्याची कार्यवाही शिघ्रगतीने व्हावी या दृष्टीकोणातूनशासनाने मजूर केलेल्या प्रत्येकी ८ मी X ५ मी. = ४० चौ. मीटर चे ५ भूखंडाचे क्षेत्रा ऐवजी मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचे नवीन सुधारीत विनंती प्रमाणे ५ भूखंडाकरीता प्रत्येकी २.५३ मी. X २.५३ = ६.४० चौ.मी. क्षेत्र शिघ्र सिध्द गणकातील तरतुदी नुसार ना-विकास क्षेत्रातील जमिनीकरीता त्या जमिनीच्या बाजार मुल्यांचे ४०% मुल्यांवर प्रचलित पी.एल.आर.चे दराप्रमाणे वार्षिक भाडे निश्चित करुन, शासनाचे अंतिम मंजूरीस अधिन राहून मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा खालील अटी व शर्तीवर सदर ५ भूखंड विदयुत सबस्टेशन करीता मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्यर लि. यांना ३० वर्षाचे भाडेत्त्वावर देण्यास मान्यता देत आहे.

<u>**अटी व शर्ती -**</u>

वरिल ५ भूखंडाचे जमिनीबाबत तात्पुरती वार्षिकं भाडेपट्टयाची रक्कम खालील प्रमाणे येत आहे.

| भु. क्र | मौजे /सर्वे नं. | क्षेत्र | युनिट क्र. | तात्पुरती वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | आरे, स.नं.१/अ | ६.४० चौ.मी. | ६ | रु.४००८/- |
| २. | आरे, स.नं.१/अ | ६.४० चौ.मी. | ५ | रु.४००८/- |
| ३. | मरोशी, स.नं.१६९ | ६.४० चौ.मी. | २५ | रु.६६३८/- |
| ४. | परजापूर, स.नं.१६ | ६.४० चौ.मी. | १९ | रु.६३२८/- |
| ५. | गोरेगांव, स.नं.१४बपैकी | ६.४० चौ.मी. | १७ | रु.५०७०/- |
| | **एकूण तात्पुरती वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम :-** | | | **रु.२६,२१२/-** |

१. उक्त तात्पुरती वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम **रु.२६,२१२/-** पे ऑर्डर व्दारे **Collector, Mumbai Suburban District** यांचे नांवे काढून ७ दिवसात या कार्यालयात जमा करावी. सदर रक्कम शासन जमा केल्यानंतर जागेचा ताबा देण्यात येईल.

Scanned by CamScanner

२. उक्त नमुद सबस्टेशनचे क्षेत्रा करीता देण्यात आलेली मंजूर हि शासनाचे अंतिम मंजुरीस अधिन राहून देण्यात येते आहे. त्याबाबत शासन जो कांही निर्णय घेईल तो निर्णय भाडेपट्टेदार यांचेवर बंधनकारक राहतील.

३. आरे दुग्ध वसाहतीमधील आदिवासी पाडयांना/ अधिकृत झोपडीधारकांना त्यांची विजेची निकड लक्षात घेता त्यांचेकरीताच विद्युत पुरवठा करण्यासाठी वरिल जागेचा वापर फक्त सब स्टेशन करता करावा.

४. सब स्टेशनउभारण्याबाबत शासन भविष्यात ठरविल त्या अटी व शर्ती मे. रिलायन्स एनर्जी यांना मान्य राहतील.

५. भाडेपट्टयाची गणना करणेस कोणतीही चूक झाल्याचे अथवा कमी आकारणी केल्याचे निदर्शनास आल्यास त्याप्रमाणे भाडेपट्टयाची सुधारीत आकारणी करणेत येईल.

६. विद्युत सब स्टेशन उभारण्याचे क्षेत्राबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी आरे, नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले /मालाड / गोरेगाव व तहसिलदार अंधेरी / बोरीवली यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधुन क्षेत्र व जागा निश्चित करुन घ्यावे, तसचे सदर ५ भूखंडाचा ताबा त्यांच्या मार्फत घ्यावा.

७. कंपनीस किंवा तिचे व्यवस्थापक व अभिहस्तांकित यांना मंजूर भाडेपट्टयाची जमीन किंवा तिच्यावरील कोणताही भाग किंवा हितसंबंध हस्तांतरीत करता येणार नाही.

८. कंपनीस मंजूर जमीन विक्री, हस्तांतरण, पोट भाडेपट्टयाने, गहाण/तारण ठेवता येणार नाही.

९. सदर जागेची आवश्यकता शासनांस भासल्यास, ती मुदतपूर्व काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी/ शासन यांना राहील.

१०. वरील कोणत्याही अटी / शर्तीचा भंग झाल्यास नुकसान भरपाई न देता जमीन शासनजमा करणेत येईल.

११. वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र कंपनीने रु.२२०/- चे मुद्रांकित पेपरवर १५ दिवसात सादर करावे. हमीपत्र सादर केल्यानंतर योग्यती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सही/- २०/११/१२

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

अवलप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही आहे.

प्रति,
महाव्यवस्थापक,
मे.रिलायन्स इनफास्ट्रक्चर लि.,
पश्चिम द्रुतगती मार्ग, दिंडोशी गोरेगांव (पूर्व),
मुंबई - ४०००९७.

प्रत : १) मा.प्रधान सचिव ( महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांचेकडे माहितीकरीता सविनय सादर.
२) मा.प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे ज्ञापन क्र.एएमसी २०१०/प्र.क्र.३१५/पदुम-१० दि.१९/१०/२०११. नुसार माहितीकरीता सविनय सादर.



Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

क्र. एएमसी -२०१०/ प्र. क्र. ३१५/पदुम-१०
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग,मंत्रालय विस्तार,
मादाम कामा रोड, राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ जुलै,२०१३

06 AUG 2013
17502

**विषय:- आरे दुग्धवसाहतीमधील आदिवासी पाडयांना/अधिकृत झोपडपट्टी धारकांना स्वतंत्र मीटरव्दारे विद्युत पुरवठा करण्याकरिता मे रिलायन्स एनर्जी यांना भूखंड देण्याबाबत.**

वाचा:- १) शासन ज्ञापन समक्रमांक दि. १९/१०/२०११

२)जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे आदेश क्र. सी/कार्या-३-डि/कानि २९२/२०११ दि. २०/११/२०१२

**ज्ञापन :-**

शासन ज्ञापन समक्रमांक दि. १९.१०.२०११ अन्वये आरे दुग्ध वसाहतीमधील आदिवासी पाडयांना/ अधिकृत झोपडीधारकांना स्वतंत्र मीटरव्दारे विद्युत पुरवठा करण्यासाठी मे.रिलायन्स एनर्जी यांना ८ मी. X ५ मी = ४० चौ. मी. चे ५ भूखंड ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यासाठी विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तथापि, मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी त्यांच्या दि. ३१/१०/२०११ च्या पत्रान्वये भूखंडाचे क्षेत्र कमी करण्याबाबतच्या विनंतीचा विचार करुन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी त्यांच्या दि. २०/११/२०१२ च्या आदेशान्वये सुधारित क्षेत्राचे भूखंड देण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत तसेच केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी मिळण्याची विनंती शासनास केली आहे. त्यासंदर्भात महसूल व वन विभागाने केलेल्या विनंतीचा विचार करुन सदर प्रयोजनार्थ देण्यात आलेल्या पाच भूखंडाच्या क्षेत्रामध्ये सुधारणा करुन आता खालील तक्त्यामधील स्तंभ क्र. ४ मध्ये नमूद केल्यानुसार सुधारीत क्षेत्राचे ५ भूखंड महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास याव्दारे शासनाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मौजे/सर्व्हे नं. | युनिट क्र. | सुधारित क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | मौजे आरे सर्व्हे नं. १/ अ, नवा पाडा | ६ | २.५३ मी.x२.५३ मी.=६.४०चौ. मी |
| २. | मौजे आरे सर्व्हे नं. १/ अ, वनीचा पाडा | ५ | २.५३ मी.x२.५३ मी.=६.४०चौ. मी |
| ३. | मौजे मरोशी सर्व्हे नं. १६९, खंबाचा पाडा/देवीचा पाडा/गावदेवी पाडा/ मटई पाडा | २५ | २.५३ मी.x२.५३ मी.=६.४०चौ. मी |
| ४. | मौजे परजापूर सर्व्हे नं. १६ नवापाडा | १९ | २.५३ मी.x२.५३ मी.=६.४०चौ. मी |
| ५. | मौजे गोरेगांव सर्व्हे नं. १४/ ब पैकी | १७ | २.५३ मी.x२.५३ मी.=६.४०चौ. मी |



Scanned by CamScanner

२. सदरच्या ज्ञापनामुळे यापूर्वी महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित केलेल्या क्षेत्रामध्ये बदल होत असल्यामुळे जास्तीचे क्षेत्र महसूल व वन विभागाने या विभागाकडे परत करावे.

३. सुधारणा केल्यानुसार जमीनीचे भाडे तसेच हस्तांतरणाबाबत अटी व शर्ती ठरवण्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही महसूल व वन विभागाने करावी.

(दी. नि. केंद्रे)
**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, आरे, मुंबई- ६५
३) जिल्हाधिकारी, बृहन्मुंबई उपनगर, वांद्रे, मुंबई
४) अवर सचिव (ज-३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
५) निवडनस्ती

Scanned by CamScanner